गोंदिया जिल्हा पोलीस वार्तापत्र

दिनांकः- २५/०७/२०१८

**१) पो.स्टे.अर्जुनी/मोरः- दुखापत**

दिनांक २४/०७/२०१८ चे १२.४४ वा. सुमारास मौजा तावशी खुर्द येथे, फिर्यादी प्रमोद अर्जुन शहारे वय ३८ वर्षे रा. तावशी यास २९ वर्षीय आरोपीस तु मला वाकडा का बोलला या कारणावरुन आरोपीने फिर्यादी सोबत भांडण व शिवीगाळ करुन, लाकडी काठीने डोक्यावर मारुन जख्मी करुन मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीच्या तक्रारीवरुन व वैद्यकीय अहवालावरुन पो.स्टे. अर्जुनी/मोर येथे अप.क्र. १०५/२०१८ कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास स.फौ. बुराडे पो.स्टे. अर्जुनी/मोर करीत आहेत.

**२) पो.स्टे.आमगांव :- लहान बाळास उद्देशपुर्वक लपवुन विल्हेवाट लावणे**

दिनांक २४/०७/०१८ चे १७.०० वा. सुमारास मौजा मोहनटोला येथे, फिर्यादी सौ. नर्मदा राधाकिसन चुटे, वय ५० वर्ष रा. आमगांव येथे, अज्ञात आरोपी महिलेने जन्मास आलेल्या अर्भकाला उद्देशपुर्वक लपवुन नालीत टाकुन विल्हेवाट लावल्याने फिर्यादीचे तक्रारीवरुन पो.स्टे. आमगांव येथे अप.क्र. १५१/०१८ कलम ३१८ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला सदर गुन्हयाचा तपास पोउपनि. घंटे पो.स्टे.आमगांव करीत आहेत.

**३) पो.स्टे.सालेकसा :- शासकीय कामात अडथळा निर्माण करुन जिवे मारण्याची धमकी देणे**

दिनांक २४/०७/२०१८ चे १५.४५ वा. सुमारास मौजा पोवारीटोला येथे, फिर्यादी किशोर गोपीचंद नेवारे वय ५४ वर्षे रा. गोंदिया हा बस क्र. एम. एच. १२ एफ. ६८५५ चा वाहक असुन गोंदिया ते सालेकसा मार्गावर आपले कर्तव्य बजावत असतांना पोवारीटोला गावाजवळ ०२ आरोपीतांनी संगनमत करुन वाहक व चालक यांना आम्ही तिकीटाचे पैसे देणार नाही, या कारणावरुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी देवुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने फिर्यादीच्या तक्रारीवरुन अप क्र. १६२/०१८ कलम ३५३,३३२,३४,५०४,५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो.उपनि. देव पो.स्टे. सालेकसा हे करीत आहेत.

(आर.बी.मेढे)
पोलीस निरिक्षक
जिल्हा विशेष शाखा,गोंदिया